# <u>नियमित दिवाणी दावा क्र. ६७/२०१८ मधील नि.३२ वरील आदेश</u>

<u>(CNR NO. MHBI12003352018)</u>

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, धारुर यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, वादीने वादग्रस्त जमीन स.न. १०८/1 मधील १ हे. ३९ आर जमीनीबाबत कायम मनाई हुकुम मिळणेबाबत दावा दाखल केलेला आहे. वादीने आपल्या दाव्याच्या कलम क्र. २ मध्ये असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांची जमीन वादग्रस्त जमीनीच्या पश्चिम बाजूकडून आहे. वादीने दाव्यासोबत दिलेल्या नकाशातही प्रतिवादी क्र. १ व २ यांची जमीन स.न. ९४ ही वादीच्या वादग्रस्त जमीनीच्या पश्चिम बाजूकडून आहे. तसेच वादीने नकाशात वादी व प्रतिवादी यांच्या जमीनीच्या मधून एक रस्ता आहे असेही दर्शवलेले आहे. सदर रस्ता मागील ५० ते ७५ वर्षांपासून कायम आहे असेही वादीने दाव्यात कथन केलेले आहे. वादीने दाव्यात पुढे असेही कथन केले आहे की प्रतिवादी क्र.१ व २ हे कोणतेही कारण नसताना वादीच्या वादग्रस्त जमीनीच्या पश्चिम बाजूकडील रस्ता व नंबरबांध बेकायदेशीररित्या फोडुन प्रतिवादी क्र. १ व २ वादीच्या वादग्रस्त जमीनीवर अतिक्रमण करण्याच्या धमक्या देत आहेत. त्यामुळे वादीने अर्ज मंजूर करुन तालुका भूमी अभिलेख, धारुर यांना सदर प्रकरणात कमिशनर म्हणून नियुक्त करुन त्यांच्याकडून वादीचा स.नं. १०८ व प्रतिवादीचा स.नं. ९४ ची मोजणी करण्यावी यावी व वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेला दक्षिण–उत्तर बांध निश्चित करावा, तसेच बांध निश्चीत झाल्यानंतर बांधाच्या खुणा कायम करण्यात याव्यात व मोजणी व बांध निश्चीतीचा सविस्तर अहवाल नकाशासह सादर करावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन प्रकरणात प्रतिवादी क्र. २ यांनी त्यांच्या हिस्याची असणारी जमीन पूर्वी मोजणी करुन घेतलेली असुन त्यानुसार नकाशा देखील दाव्यात दाखल आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपिठ औरंगाबाद येथील रिट पिटीशन क्र. २१५/२०२१ नुसार सदरील स्टेज ही कोर्ट कमिशनर नियुक्तीची नाही. वादी मा.

न्यायालयाच्या मदतीने दाव्यात सदरील अर्जाचा आधार घेवून पुरावा गोळा करण्याच्या प्रयत्नात आहेत. सदरचा दावा हा मनाई हुकुमाबाबत आहे. त्यामुळे सदरचा अर्ज चालण्यास पात्र नाही. त्यामुळे वादीचा सदर अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज वाचला. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षकारांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता सदरचा दावा हा कायम मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. वादीचे असही कथन आहे की, प्रतिवादी हे त्याच्या जमीनीत येवून अडथळा करतात व बांध फोड करण्याची व रस्ता फोड करण्याची धमकी देवून अतिक्रमण करण्याची धमकी देतात. त्यामुळे वादीने सदरचा कायम मनाईचा दावा दाखल केला आहे. वादीने याकामी प्रतिवादी विरुध्द केवळ कायम मनाईची दादा मागीतलेली आहे. वादीचे सदर दाव्यात असे कोठेही कथन नाही की, प्रतिवादींनी दावा मिळकतीत अतिक्रमण केले आहे. त्यामुळे सदरच्या कायम मनाईच्या दाव्यात तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, धारुर यांचे मार्फत मोजणी करुन अहवाल घेवून पुरावा घेतल्यास दावा निकाली करणेसाठी कोणत्याही मुदयावर मदत होणार नाही. सदरचा दावा हा वादींनी प्रतिवादी विरुध्द मनाई मागण्याकरीता केलेला आहे. त्यामुळे सदर कामी अतिक्रमणाची कोणतीही दाद वादींनी मागीतली नसल्याने व वादीच्या दाव्यातील कथनांवरुन तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, धारुर यांची दावा मिळकत व प्रतिवादींची मिळकत मोजणी करण्यास कोणतेही कारण दिसुन येत नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

NILESH MALAKAPPA WALI

Digitally signed by NILESH MALAKAPPA WALI
Date: 2024.09.13 15:26:21 +0300

स्थळ धारुर (निलेश एम.वाली)

दिनांकः १३.०९.२०२४. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, धारुर.